|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## (पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)

(Formerly North Maharashtra University, Jalgaon)

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/दी.सं.३०/१२१५/२०२२ दिनांक: १४.०५.२०२२

प्रति,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र
विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य तसेच
मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक........

**विषय**:-कबचौउमविच्या तिसाव्या दीक्षांत समारंभाविषयी माहिती व अहवाल सादर करणेबाबत .....

महोदय/महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा ३० वा दीक्षांत समारंभ **माननीय श्री. भगत सिंह कोश्यारी, राज्यपाल (महाराष्ट्र राज्य) तथा कुलपती कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव** यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दिनांक २४ मे, २०२२ रोजी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या समारंभास अतिथी म्हणून **मा. ना. श्री. उदयजी सामंत,** उच्च व तंत्रशिक्षण मंत्री (महाराष्ट्र राज्य), **मा.ना. श्री. गुलाबरावजी पाटील,** पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री (महाराष्ट्र राज्य) तथा पालकमंत्री जळगाव जिल्हा आणि **मा. ना. अब्दुलजी सत्तार,** महसूल, ग्रामविकास बंदरे, खार जमिनी विकास, विशेष सहाय्य राज्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) तथा पालकमंत्री धुळे जिल्हा हे उपस्थित राहणार आहेत. तसेच **मा. डॉ. भूषण पटवर्धन, चेअरमन, नॅशनल ॲसेसमेंट ॲन्ड ॲक्रिडेशन कौन्सिल (NAAC) बेंगलोर** हे आभासी पध्दतीने (Online) सहभागी होणार असून, दीक्षांत भाषण करणार आहेत.

विद्यापीठाच्या तिसाव्या दीक्षांत समारंभाविषयीची संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यांत येत आहे. सदर दीक्षांत सोहळ्याचे थेट प्रक्षेपण विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावरुन दिनांक २४ मे, २०२२ रोजी सकाळी ०९.३० वाजता प्रक्षेपित करण्यांत येणार असून, त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, हे प्रक्षेपण आपण आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील विद्यार्थ्यांना एका सभागृहात एकत्रित करुन दाखवावे. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल परीक्षा व मूल्यमापन विभागास ०८ दिवसांच्या आंत सादर करावा, ही विनंती.

तरी उपरोक्तसंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

आपला स्नेहांकीत,

सही/- xxx

**(प्रा. दिपक श. दलाल)**
प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ